admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२२१८/१७०७

दि. २१ जुलै,२०१८

## प रि प त्र क

विषय:- पदविका प्रवेश प्रक्रिया २०१८-१९
उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (Non Creamy Layer) प्रमाणपत्राबाबत.

पदविका प्रवेश प्रक्रियेंतर्गत विमुक्त जाती, अनुसूचित जमाती (ब), अनुसूचित जमाती (क), अनुसूचित जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग ह्या प्रवर्गांना उन्नत व प्रगत गटाचे (Non Creamy Layer) प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आलेले आहे. मात्र बरेच उमेदवार सदरचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासकीय कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रकरणाची पावती अपलोड करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टिकोनातून या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, ज्या उमेदवारांनी वरीलप्रमाणे पावती अपलोड केलेली आहे किंवा अपलोड करणार आहेत, अशा उमेदवारांना ऑनलाईन प्रवेश फेरी अंतर्गत प्रवेश वाटपाकरिता संबंधित प्रवर्ग लागू करण्यात येईल, मात्र प्रवेशाचे वाटप झाल्यानंतर विहित केलेल्या मुदतीत संबंधित विद्यालयात मूळ कागदपत्रे सादर करतेवेळी उन्नत व प्रगत गटाचे (Non Creamy Layer) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल. असे न केल्यास अशा उमेदवाराचे प्रवेश वाटप रद्द करून त्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून ग्राह्य धरून पुढील ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

याचबरोबर असेही सूचित करण्यात येते की, दि. ०३/०९/२०१८ ते ०५/०९/२०१८ या कालावधीमध्ये होणाऱ्या जागेवरील प्रवेश फेरीच्या प्रक्रियेमध्ये विमुक्त जाती, अनुसूचित जमाती (ब), अनुसूचित जमाती (क), अनुसूचित जमाती (ड), इतर

admn 18-19

मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग हया प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांना उन्नत व प्रगत गटाचे (**Non Creamy Layer**) प्रमाणपत्र प्रवेशाचेवेळी सादर करणे अनिवार्य आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

संचालक (शिक्षण)

करिता

प्रति,

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करावे तसेच परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.,

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रतः- कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर /डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी